PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Bhagyalakshmi
Year: 1962

Song: Jai devi Mangalagauri
Lyricist: Shanta Shelke

जय देवी मंगळागौरी
जय देवी मंगळागौरी
ओवाळीन सोनिया ताटी
ओवाळीन सोनिया ताटी
जय देवी मंगळागौरी
जय देवी मंगळागौरी

फू फू फू बाई फुगडी फू
फू बाई फू फुगडी फू
खार बाई खार लोणच्याचा खार
पतीदेव म्हणतात खेळू नको फार
फू बाई फू फुगडी फू
फू बाई फू फुगडी फू
झाड बाई झाड लाजाळूचं झाड
नवऱ्याच्या प्रेमात करते वाढ
फू बाई फू फुगडी फू
फू बाई फू फुगडी फू
फू बाई फू फुगडी फू

नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
या गावचा त्या गावचा
शिंपी नाही आला
चोळी नाही मला
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
या गावचा त्या गावचा
सोनार नाही आला
बिलवर नाही मला
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
या गावचा त्या गावचा
कासार नाही आला
चुडा नाही मला
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू

का गं का गं माझ्या नणंदे भांडतेस का गं
भावाला चहाड्या सांगतेस का गं
का गं का गं
माझ्या भावजयी झोपतेस का गं
कामाच्या वेळी लपतेस का गं
का गं का गं
माझ्या नणंदे छळतेस का गं
कामाच्या वेळी पळतेस का गं
का गं का गं
माझ्या भावजयी रूसतेस का गं
स्वारीला बघताच हसतेस का गं
का गं का गं का गं का गं

सासुरवाशी सून रूसून बसली कैशी
यादवराया राणी घरास येईना कैशी

PlanetRead
Literacy for a Billion

सासुरवाशी सून रूसून बसली कैशी
सासू गेली समजावयाला
उठ उठ सूनबाई चल गं घराला
अर्धा संसार देते तुजला
अर्धा संसार नकोच मजला
मी नाही यायची तुमच्या घराला
सासुरवाशी सून रूसून बसली कैशी
यादवराया राणी घरास येईना कैशी
नणंद गेली समजावयाला
चल चल वहिनी आपुल्या घराला
अर्धा खेळ मी देते तुजला
तुमचा खेळ नकोच मजला
मी नाही यायची तुमच्या घराला
सासुरवाशी सून रूसून बसली कैशी
यादवराया राणी घरास येईना कैशी
सासुरवाशी सून रूसून बसली कैशी

खुर्ची का मिरची जाशील कैशी
खुर्ची का मिरची जाशील कैशी
खुर्ची का मिरची जाशील कैशी
सासू मारीते बरं करीते
नणंद छळिते बरं करीते
नवरा बोलावतो बरं बोलावतो
खुर्ची का मिरची जाशील कैशी
खुर्ची का मिरची जाशील कैशी
खुर्ची का मिरची जाशील कैशी
खुर्ची का मिरची जाशील कैशी
खुर्ची का मिरची जाशील कैशी

घाल पिंगा गं पोरी पिंगा गं पोरी
पिंगा गं पोरी पिंगा
माझं सासर सात तालाचं मोठ्या मोलाचं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
माझ्या घराचा शोभे कळस दारी तुळस
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
माझा सासरा नाही अन्यायी थोर पुण्याई
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
माझी सासू गं छाया आईची शाल मायेची
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
माझा दिर गं मोठा उदार मला आधार
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
माझी नणंद कोर चंद्राची नार इंद्राची
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
माझी जाऊ गं मोठी प्रेमळ मन निर्मळ
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
पतीराजाचं मन देवाचं पाणी गंगेचं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा गं पोरी पिंगा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*